पुढारी

# ‘एसएलबीसी’च्या शिबिरास केरीत प्रतिसाद

## केवायसीसह विविध योजनांची व्याप्ती वाढविण्यावर भर




केरी-फोंडा : शिबिरात मार्गदर्शन करताना एसबीआय बँकेचे अधिकारी.

**पणजी : पुढारी वृत्तसेवा**

वित्तीय सेवा विभागाने सुरू केलेल्या वित्तीय समावेशन योजनांच्या तीन महिन्यांच्या देशव्यापी संपृक्तता मोहिमेचा एक भाग म्हणून नुकतेच फोंडा तालुक्यातील केरी पंचायतीत राज्यस्तरीय बँकर्स समिती (एसएलबीसी) आयोजित शिबिरास प्रतिसाद लाभला.

प्रधानमंत्री जन धन योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना या सारख्या जनसुरक्षा योजनांची व्याप्ती वाढविण्यासाठी आणि केवायसीची फेरपडताळणी करण्यासाठी हे शिबिर आयोजित केले होते. या शिबिराला प्रियोळचे आमदार गोविंद गावडे उपस्थित होते.

गावडे यांनी ग्रामस्थांना शासनाच्या विमा व पेन्शन (निवृत्ती वेतन) योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. अशा प्रकारचे शिबीर आयोजित केल्यामुळे दुर्गम भागातील लोकांना सरकारी योजनांमध्ये नावनोंदणी करण्याची आणि त्यांचे केवायसी अद्ययावत करण्याची संधी मिळते, असे म्हणत शिबिर आयोजित केल्याबद्दल एसएलबीसीची त्यांनी प्रशंसा केली.

रिझर्व्ह बँकेचे कार्यकारी संचालक अर्णब कुमार चौधरी यांनी तळागाळापर्यंत वित्तीय समावेशनाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि वित्तीय जागरूकता वाढवण्यासाठी आरबीआय बजावत असलेल्या भूमिकेवर प्रकाश टाकला. त्यांनी केवायसी आणि री-केवायसीचे महत्त्व सोप्या भाषेत समजावून सांगितले आणि बँकिंग सेवांचा सुरळीत पुरवठा राहावा, यासाठी ग्रामस्थांनी त्यांचे री-केवायसी पूर्ण करावे, असे आवाहन केले.

रिझर्व्ह बँकेचे प्रादेशिक संचालक प्रभाकर झा यांनी उपस्थितांना योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आणि डिजिटल फसवणूक रोखण्यासाठी सायबर सुरक्षेवरही भर दिला.

एसबीआयचे सहाय्यक महाव्यवस्थापक कार्लोस रॉड्रिग्ज यांनी स्वागत केले, तर एसबीआयचे डीजीएम शैलेंद्र मिश्रा यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला नाबार्डचे महाव्यवस्थापक संदीप धारकर, आयओबीचे प्रादेशिक प्रमुख कुणाल सिंग, जीएससीबीचे व्यवस्थापकीय संचालक अनंत चोडणकर आणि आरबीआय आणि इतर बँकांचे उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते.